


**शिवसेना कार्यप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या 'महाराष्ट्र देशा', 'पहावा विठ्ठल' तसेच शिवसेनाप्रमुखांच्या 'विचारांचं सोनं' या पुस्तकांच्या ई आवृत्तीचे प्रकाशन उद्धव ठाकरे यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी रिपब्लिकन नेते रामदास आठवले, शिवसेना नेते खासदार मनोहर जोशी, सुधीर जोशी, दत्ताजी नलावडे, ॲड. लीलाधर डाके, खासदार संजय राऊत, गजानन कीर्तिकर, आमदार सुभाष देसाई, दिवाकर रावते, रामदास कदम, उपनेते खासदार अनंत गीते, महापौर श्रद्धा जाधव, दांगट न्यूज एजन्सीचे बाजीराव दांगट तसेच बुकगंगा डॉटकॉमचे संजय पेठे व मंदार जोगळेकर उपस्थित होते.**

## 'महाराष्ट्र देशा', 'पहावा विठ्ठल' एका क्लिकवर

शिवकालीन गडकिल्ल्यांचे विहंगम दर्शन घडविणारे उद्धव ठाकरे यांचे 'महाराष्ट्र देशा' व पंढरपूरच्या वारीतील छायाचित्रांतून साक्षात विठ्ठलाची अनुभूती देणारे 'पहावा विठ्ठल' तसेच शिवसेनाप्रमुखांच्या ज्वलंत विचारांचे संकलन असलेले 'विचारांचं सोनं' ही पुस्तके आजपासून एका क्लिकवर आली आहेत. उद्धव ठाकरे यांच्या हस्ते या पुस्तकांच्या ई आवृत्तीचे प्रकाशन करण्यात आले. बुकगंगा डॉटकॉमने ही सुविधा मराठी वाचकांना उपलब्ध करून दिली. या कार्यक्रमाला सौ. रश्मी ठाकरे यांच्यासह शिवसेना नेते खासदार मनोहर जोशी, सुधीर जोशी, दत्ताजी नलावडे, ॲड. लीलाधर डाके, शिवसेना विधिमंडळ पक्षनेते सुभाष देसाई, खासदार संजय राऊत, विधान परिषदेतील विरोधी पक्षनेते दिवाकर रावते, गजानन कीर्तिकर, रामदास कदम, उपनेते खासदार अनंत गीते, महापौर श्रद्धा जाधव, सचिव विनायक राऊत, अनिल देसाई, दांगट न्यूज एजन्सीचे बाजीराव दांगट, भारतीय कामगार सेनेचे सूर्यकांत महाडिक, 'फ्रेंड्स ऑफ शिवसेना'चे किरण जोगळेकर, मुकुंद कुटे उपस्थित होते. शिवसेना सचिव आदेश बांदेकर यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी 'केशवा माधवा' हे दोन अंकी नाटक दाखविले गेले. यावेळी 'शिवशक्ती-भीमशक्ती सत्तेकडे' या पुस्तकाचेही प्रकाशन करण्यात आले.